# भक्ती

## ‘आनंदमय जन्मदिवस’ याप्रीत्यर्थ
## गुरुमाई चिद्विलासानंद यांनी निवडलेला एक सद्गुण

### सिद्धयोग ध्यानशिक्षिका लॉरा डिकिन्सन् यांच्याद्वारे लिखित भाष्य

‘भक्ती’च्या अर्थामध्ये निहित आहेत, प्रगाढ श्रद्धायुक्त आदर आणि दिव्य आराधनेचा भाव, आंतरिक विश्वासाचा भाव आणि बाह्य रूपाने त्याचा अभ्यास करणे.[१] ‘भक्ती’ हा संस्कृत शब्द आहे आणि वेदकालीन श्रेष्ठ देवर्षी नारद यांनी ह्या विषयावर ‘नारद भक्तिसूत्र’ नामक संपूर्ण ग्रंथाची रचना केली आहे. नारदांनी भक्तीची व्याख्या ‘परम प्रेम रूप’ अशा प्रकारे केली आहे, ज्यामध्ये त्यांना अभिप्रेत आहे ईश्वराविषयीचे प्रेम.[२] जसजसे आपण आध्यात्मिक मार्गावर प्रगती करत जातो, तसतसे अशा प्रकारचे विशुद्ध प्रेम नैसर्गिकपणे आणि स्वाभाविकपणे उदयास येऊ लागते.

सत्याच्या प्रत्येक जिज्ञासूमध्ये, त्याच्या स्वतःच्या अंतरी विद्यमान असलेल्या भक्तीच्या स्रोतापर्यंत पोहोचण्याची उपजत क्षमता असते, कारण आध्यात्मिक अभ्यास करण्याची तीव्र उत्कंठा ही मुळात भक्तीच असते. तुम्ही जेव्हा आध्यात्मिक अभ्यास करता, तेव्हा भक्ती एका भावनेच्या रूपात प्रकट होते जिचे अनेक रस आणि रूपे असू शकतात, जसे की, अंतरात उदयास येणारी गहन शांतीची स्थिती; अमृतासमान माधुर्य जे तुमच्या अस्तित्वाच्या कणाकणाला व्यापून टाकते; एक आनंदमय ऊर्जा जी तुमच्या हृदयातून प्रस्फुटित होते.

भक्ती स्वतःच एक अभ्यासदेखील आहे. तेराव्या शतकातील महान सिद्धसंत ज्ञानेश्वर महाराज यांनी श्रीभगवद्गीतेवर काव्यात्मक भाष्य लिहिले आहे. भक्तिमय साधनेचे रहस्य उलगडून सांगणारे हे भाष्य त्या साधकाकरिता एक मार्ग खुला करते, ज्याला भक्तीचे पोषण करण्याची अभिलाषा आहे.

ज्ञानेश्वर महाराज लिहितात,

> कां चैतन्याचिये पोवळी - । माजीं आनंदाचां राउळीं ।
> गुरुलिंगा ढाळी । ध्यानामृत ॥
> उदयिजतां बोधार्का । बुद्धीची डाल सात्त्विका ।
> भरोनि त्र्यंबका । लाखोली वाहे ॥

> आत्मानंदरूपी मंदिरात, [साधक] त्याच्या श्रीगुरूंची मूर्ती स्थापित करतो आणि ध्यानाच्या अमृताने तिचा अभिषेक करतो. परब्रह्माच्या बोधरूपी सूर्याचा जेव्हा उदय होतो, तेव्हा तो आपली बुद्धीरूपी परडी विशुद्ध भावाच्या फुलांनी भरतो; आणि हीच शुद्ध भावरूपी फुले तो त्याच्या श्रीगुरूरूपी भगवान शंकराला [त्र्यंबकाला] अर्पण करतो.[३]

ह्या भाष्यामध्ये साधक या बोधामध्ये स्थिर होतो, की त्याचे हृदय एक मंदिर आहे आणि तिथे आपल्या गुरुदेवांचे मानस-चित्रण करून तो त्यांचे ध्यान करतो. ज्या आंतरिक मूर्तीचे तो आवाहन करतो, तिच्यामुळे भक्तिभाव जागृत होतो. हे भक्तिपूर्ण प्रेम जेव्हा वाढत जाते, तेव्हा साधक त्याला एक पवित्र प्रसाद मानून पुन्हा आपल्या श्रीगुरूंना अर्पित करतो. तो हा बोध धारण करतो, की श्रीगुरू हे भगवान त्र्यंबक [शंकर] आहेत. जेव्हा साधक अंतरात हे मानस-चित्रण करत राहतो, तेव्हा त्याच्या अंतरात भक्ती जागृत होते.

तुम्ही आंतरिक रूपाने, ईश्वराच्या सृष्टीतील एखाद्या पैलूवर आपले लक्ष केंद्रित करूनही भक्तीचा अभ्यास करू शकता. उदाहरणार्थ, तुम्ही निसर्गातील एखाद्या दृश्याची कल्पना करू शकता, जसे की, एखादा भव्य पर्वत, एक विशाल वृक्ष किंवा एक प्रशांत सरोवर. ‘या रूपांमध्ये दिव्यता निहित आहे’ ह्या बोधासह जेव्हा तुम्ही त्यांच्याकडे आपले लक्ष वळवता, तेव्हा तुमच्या हृदयाच्या अंतरतम स्थानात ईश्वराप्रति प्रेम उदयास येऊ शकते.

*The Yoga of Discipline,* या आपल्या पुस्तकात श्रीगुरुमाई भक्तीच्या महान शक्तीचे वर्णन करतात. त्या म्हणतात,

> ईश्वरावरील भक्ती ही एका भावनेपेक्षा कितीतरी अधिक आहे. तुमच्या भक्तीद्वारे, ईश्वर तुमच्यासाठी जिवंत होतो. तुमच्या भक्तीद्वारे, तुम्ही तुमच्या आराध्याला तुमच्या शरीरात, तुमच्या मनात, तुमच्या जीवनात आमंत्रितदेखील करता. निराकार, एक असा आकार धारण करतो ज्याच्याशी तुम्ही अनुसंधान साधू शकता.[४]

जेव्हा तुम्ही तुमच्या आराध्याला, तुमच्या उपास्यमूर्तीला स्वतःमध्ये प्रतिष्ठापित करता, तेव्हा एक आंतरिक किमया घडून येते. आंतरिक आध्यात्मिक शक्ती, कुंडलिनी तुमच्या अंतरी विकसित होत जाते आणि तुम्ही ज्याची आराधना करत आहात त्याचे गुण तुम्ही स्वतःच्या अंतरी ग्रहण करू लागता. तुमच्या अंतरी भक्ती पल्लवित होते आहे याचा जेव्हा तुम्ही दृढ विश्वासासह स्वीकार करता, तेव्हा तुम्ही ईश्वराप्रति प्रगाढ प्रेमभावनेला पोषित करता आणि या प्रक्रियेत भगवंत तुमच्यासाठी जिवंत होतो.

## भक्तीसाठी अभिकथन

मी दृढ विश्वासासह याचा स्वीकार करतो की,
माझ्या हृदयमंदिरात भक्तीची शक्ती विद्यमान आहे.

*[अभिकथन—ते कथन ज्याचे जागरूकतेसह वारंवार उच्चारण केले जाते, जेणेकरून ते आपल्या चेतनेत स्थिरावेल.]*

---

[१] *The Shorter Oxford English Dictionary,* पाचवी आवृत्ती [ऑक्सफर्ड, इंग्लंड : ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, २००२].

[२] भक्तिसूत्र, २; विलियम के. महोनी, *Exquisite Love: Reflections on the spiritual life based on Narada's Bhakti Sutra* [डेविडसन, NC : सर्वभाव प्रेस, २०१४] पृ. ३७.

[३] ज्ञानेश्वरी १३.३८६-८७.

[४] गुरुमाई चिद्विलासानंद, *The Yoga of Discipline* [साउथ फॉल्सबर्ग, न्यूयॉर्क : एस. वाय. डी. ए. फाउंडेशन, १९९६] पृ. २६.

© २०२० एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.